بسم اللہ الرحمن الرحیم    نحمدہ ونصلی علی رسولہ الکریم    وعلی عبدہ المسیح الموعود

لا الہ الا اللہ محمد رسول اللہ

دفتر مجلس انصار اللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in    محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) यांच्या विवेकपूर्ण उपदेशांद्वारे सदाचरणाचे स्पष्टीकरण आणि संपादणाचा सल्ला

## जुमआ'च्या दिवशी एक अशी वेळ येते ज्यामध्ये प्रार्थना स्वीकारली जाते.

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक २१ अप्रैल २०२३, मशिद मुबारक,

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔ إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ
نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

तशह्हुद, तआवुज आणि सुरह फातिहा पठण केल्यानंतर, हुजूर अनवर म्हणाले: रमजानचा महिना संपला आहे आणि असे बरेच लोक असतील ज्यांनी रमजानमध्ये उपासना करण्याची आणि स्वतःमध्ये विशेष बदल करण्याची योजना आखली असेल परंतु त्यांना वाटल्याप्रमाणे त्यांचे पालन करता आले नाही. बरेच लोक मला असे लिहितात.

हुजूर म्हणाले: शुक्रवार हा शुभ दिवस आहे ज्यामध्ये प्रार्थना स्वीकारण्यासाठी एक विशेष वेळ ठराविक आहे. म्हणून, आमचे रमजान त्याप्रकारे गेले नाही जशी आमची इच्छा होती तरी देखील आम्हाला हे ध्येय करायला हवे आणि प्रार्थना करायला हवी की सर्वशक्तिमान अल्लाह आमच्या कमकुवतपणाकडे दुर्लक्ष करेल आणि आम्हांवर दया करेल आणि यामार्गावर कायस्वरूपी मार्गस्थ होण्याचे सामर्थ्य प्रदान करेल. अल्लाह परम दयाळू आहे. आमच्या प्रार्थनेच्या स्वीकृतीसाठी, केवळ रमजान महिन्यात शुक्रवारी एक काळ असतो ज्यामध्ये प्रार्थना स्वीकारल्या जातात, असे परमेश्वराने म्हटले नाही, तर त्याने प्रत्येक शुक्रवारी हा काळ उपलब्ध केलेला आहे.

म्हणून जर आपण आज आपल्या प्रार्थनेत असे प्रण घेतले की, या रमजाननंतरही आपण सदाचरणाचा दर्जा वाढवत राहू, त्यासाठी प्रयत्नशील राहू. अल्लाहची जवळीक साधण्याचा प्रयत्न करत राहू. पुढच्या शुक्रवारपर्यंत आपण केवळ सर्वशक्तिमान अल्लाहसाठी आपली उपासना एकनिष्ठपणे बजावत राहू, त्यानंतर प्रत्येक शुक्रवारचा मध्यवर्ती काळात आपल्या प्रार्थना आणि सत्कर्मांनी सजवण्याचा प्रयत्न करत राहू. जगावर धर्माला प्रधान्य देऊ. पुढच्या रमजानपर्यंत आम्ही हे कार्य सतत करत राहू. तर हीच कृती सदाचरण निर्माण करण्यास सहाय्यक ठरेल आणि जेव्हा आपण प्रामाणिक होऊन उपासना आणि

आपली कृत्ये सर्वशक्तिमान अल्लाहसाठी करतो, तेव्हा सर्वशक्तिमान अल्लाह, जो परम दयाळू, असीम कृपाळू आहे, तो आम्हाला याद्वारे प्राप्त होणाऱ्या आशीर्वादापासून अलंकृत करेल, ज्याचा या रमजानमध्ये आम्ही काही प्रमाणात सराव केलेला आहे.

म्हणून महत्त्वपूर्ण जी बाब आहे ती म्हणजे सदाचरण. आणि कायमस्वरूपी परमेश्वराच्या आज्ञांचे पालन करणे. खरी गोष्ट आहे सर्वशक्तिमान ईश्वराचे भय आणि त्याच्या आनंदाची प्राप्ती. आम्ही या रमजानमध्ये स्वतःला सुधारण्याचा प्रयत्न केला आहे, अल्लाह आम्हाला स्वीकारो आणि आशीर्वाद देत राहो.

तर हा मुख्य मुद्दा आहे जो आपण नेहमी समोर ठेवला पाहिजे. हे ध्येय साध्य करणे हे प्रत्येक अहमदीसमोर सदैव ठेवले पाहिजे आणि जेव्हा आपण स्वतः धर्मनिष्ठेवर आपले जीवन जगत असतो आणि अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करत असतो, तेव्हा आपण आपल्या मुलांसमोर आणि आपल्या पिढ्यांसमोर ते उदाहरण ठेवत असतो ज्याने चांगुलपणाची ज्योती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे तेवत जाते.

सदाचरण हाच तो ध्येय आहे ज्यावर अपेक्षित मसीहा (अ.स) यांनी जोर दिला आहे. एक प्रसंगी ते म्हणाले, ''मला पाठवले गेले आहे जेणेकरून सदाचरणाचे दर्जे उंचावले जावे आणि सत्य व विश्वासाचा काळ पुन्हा यावे आणि अंतःकरणात सदाचरणाचा जाग व्हावे. हेच माझ्या आगमनाचे कारण आहेत.'' म्हणून, त्यांचा कालखंड, जो प्रेषितत्वाच्या मार्गाद्वारे खिलाफतवर आधारित युग आहे, जो पवित्र प्रेषित (स.) च्या भविष्यवाण्यांनुसार निवाड्याच्या दिवसापर्यंत चालू राहणार आहे. यामध्ये त्यांच्यावर विश्वास ठेवणारेच लोक आहेत ज्यांनी सत्याला चिकटून राहून आपल्या उपासनेचे उच्च दर्जे प्रस्थापित करतील आणि हे उद्दिष्ट केवळ एक महिन्याच्या उपासनेने किंवा सत्कर्माने साध्य होऊ शकत नाही. जर आपण आपली उपासना कायमस्वरूपी स्थापित केले, तर हेच ते लोक आहेत ज्यांच्याबद्दल सर्वशक्तिमान अल्लाहने हजरत अपेक्षित मसीह यांना सांगितले होते की, मी तुमच्याबरोबर आणि तुमच्या प्रियजनांसोबत आहे. म्हणून जर या शैलीमध्ये आपण आपले जीवन जगत आहोत, तर आपल्या कृतीतून जगाला संदेश देत आहोत की, अल्लाहशी जिवंत नाते ठेवायचे असेल तर या! आणि पवित्र प्रेषितांच्या या सत्यशील दासाला स्वीकारा.

खरी धर्मपरायणता म्हणजे काय आणि त्याचे पालन करणारी व्यक्ती कोणती आणि सर्वशक्तिमान अल्लाह त्याच्याशी कसा व्यवहार करतो, या संदर्भात हजरत अपेक्षित मसीह म्हणतातः खरी धर्मपरायणतेसोबत अज्ञान एकत्र केली जाऊ शकत नाही. खरी धार्मिकतेमध्ये एक प्रकाश असतो. सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतातः हे श्रद्धावंत लोकहो! जर तुम्ही सर्वशक्तिमान अल्लाहसाठी धार्मिकतेत चिकाटीने आणि स्थिर राहण्याचे गुणधर्म अंगीकारले तर सर्वशक्तिमान ईश्वर तुमच्यात आणि इतरांमध्ये फरक करेल. फरक हा की तुम्हाला एक प्रकाश दिला जाईल, तो प्रकाश तुमच्या कृतींमध्ये आणि शब्दांमध्ये आणि

तुमच्या संवेदनांमध्ये प्रकाशित होईल, आणि तुमच्या बुद्धीत प्रकाश येईल, आणि तुमच्या विचारांमध्ये प्रकाश असेल आणि तुमच्यामध्ये प्रकाश असेल. तुमचे डोळे, तुमच्या कानात आणि तुमच्या जिभेत, तुमच्या विधानात आणि तुमच्या प्रत्येक हालचालीत आणि शांततेत प्रकाश असेल. म्हणून हीच स्थिती आहे जी एक आस्तिक आणि धार्मिक व्यक्तीने मिळवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. जरी रमजान संपला तरीही आपण हे स्थान प्राप्त करण्याचा प्रयत्न करू शकतो, आपल्यापैकी जे हे स्थान प्राप्त करतात ते भाग्यवान असतील.

आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की हे युग विशेषतः सैतानाच्या हल्ल्यांचा काळ आहे आणि तो त्याच्या सर्व युक्त्या आणि शस्त्रे घेऊन हल्ला करत आहे, अशा परिस्थितीत आपण सर्वशक्तिमान अल्लाहसमोर नेहमीपेक्षा अधिक नतमस्तक होणे आवश्यक आहे. टीव्ही असो की सोशल मीडिया किंवा इतर कार्यक्रम, मुलांच्या शाळा किंवा त्यांचे कार्यक्रम, सर्वत्र सैतानाने उपद्रवाचा एक सापळा विणला आहे ज्यातून अल्लाहच्या कृपेशिवाय सुटणे अशक्य आहे. यावेळी सर्वात महत्त्वाची चिंता म्हणजे आपल्या मुलांना सैतानाच्या हल्ल्यांपासून वाचवणे आहे. त्यासाठी पालक आणि व्यवसथापनाने प्रयत्न केले पाहिजेत. या हेतूने प्रत्येक विवेकी प्रौढ अहमदी व्यक्तीने उच्च धार्मिकतेची पातळी गाठली पाहिजे, तरच आपण आपल्या पिढ्यांचे सैतानाच्या हल्ल्यांपासून संरक्षण करू शकू. रमजानच्या नंतर आराम करणे चूकीचे आहे तर पवित्र कुरआनचा ज्ञान आणि धार्मिक ज्ञान वाढवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

हजरत अपेक्षित मसीह(अ.स.) म्हणतात की, तो निवाड्याच्या दिवसापर्यंत माझ्या अनुयायांना माझ्या अविश्वासू आणि विरोधकांवर सत्ता देईल हे खरे आहे, परंतु हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की अनुयायांपैकी प्रत्येक व्यक्ती केवळ दीक्षा घेऊन प्रवेश करू शकत नाही, जोपर्यंत तो स्वतःमध्ये अनुकरणाच्या सर्व नियमांना साध्य करत नाही. ते म्हणाले: हे स्पष्ट असले पाहिजे की केवळ जिभेने म्हणजे हृदय आणि प्रार्थनेच्या प्रामाणिकपणाने पूर्णतः अंमलात आणल्याशिवाय निष्ठा कबूल करणे निरर्थक आहे. म्हणून जी व्यक्ती माझ्या शिकवणीची पूर्ण अंमलबजावणी करते, ती माझ्या घरात प्रवेश करते, ज्याबद्दल सर्वशक्तिमान परमेश्वराचा वचन आहे की, اِنِّی اُحَافِظُ کُلَّ مَنْ فِی الدَّارِ मी तुझ्या भिंतींच्या आत असलेल्या प्रत्येकाचे रक्षण करीन.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात की, हे तर तुम्ही जाणतात की सैतान لاحول लाहौलद्वारे पळून जातो. पण तो इतका साधा आणि सरळ नाही की नुसते तोंडी लाहौल म्हटल्याने पळून जाईल. खरी गोष्ट अशी आहे की जे लाहौलच्या प्रत्येक कणात रमलेले असतात आणि जे नेहमी सर्वशक्तिमान ईश्वराची मदत आणि आधार घेतात आणि त्याच्याकडून आशीर्वाद घेतात, ते सैतानापासून वाचवले जातात.

एक ठिकाणी ते म्हणतात की प्रार्थनेचा चुंबकीय प्रभाव असतो, तो स्वतःकडे लाभ आणि कृपा आकर्षित करतो. जोपर्यंत एखादी व्यक्ती अल्लाहचा ग्रंथाला प्राधान्य देत नाही आणि त्यानुसार अंमलबजावणी करत नाही, तोपर्यंत त्याची नमाज म्हणजे केवळ वेळेचा अपव्यय आहे. हुजूर अनवर म्हणाले की, नमाज हा उपासनेचा गाभा असल्याचे एका हदीसमध्ये नमूद केले आहे. म्हणून जेव्हा आपण हा गाभा मिळवण्याचा प्रयत्न करतो तेव्हा आपण प्रार्थना आणि उपासनेचा हक्क अदा करणारे बनतो. आणि अल्लाहचे सान्निध्य प्राप्त करतो. असे असंख्य उपासक आहेत जे मशिदीत जाऊन नमाज अदा करतात आणि नंतर अत्याचार करतात.

आपल्या प्रार्थना कशा असाव्यात याबद्दल, हजरत अपेक्षित मसीह(अ.स.) म्हणतात की हे लक्षात ठेवले पाहिजे की नमाज ही अशी गोष्ट आहे जी सर्व अडचणी सुलभ करते आणि सर्व संकटे दूर करते. परंतु नमाजचा अर्थ असा नाही की जी प्रार्थना सामान्य लोक कर्मकांड म्हणून पाठ करतात, तर याचा अर्थ ती प्रार्थना आहे जी एखाद्या व्यक्तीचे हृदय वितळते आणि एकमेव विधाताच्या निवासस्थानावर पडते आणि विरगळते.

सर्वशक्तिमान अल्लाह आम्हाला नमाजचा हक्क अदा करण्याचे सामर्थ्य प्रदान करो. आपल्या पिढ्यांना अशा उपासनेची सवय लावण्याचे प्रयत्न करूया ज्यामुळे त्यांचे अस्तित्व आणि भावी पिढ्यांचे अस्तित्व सुनिश्चित होईल. या युगात दज्जलचा नाश होणे निश्चित आहे, हे अल्लाहचे हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांना दिलेले वचन आहे. हे आमचे सौभाग्य असेल की आम्ही त्यालोकांमध्ये गणले जावे जे हजरत मसीहच्या अनुयायींमध्ये खऱ्या अर्थाने समाविष्ट आहेत. हे स्थान प्राप्त करण्यासाठी ते म्हणतात की तुमच्या दिवसाचा किंवा रात्रीचा एकही तास प्रार्थनांनी रिकामा नसावा. अल्लाह आम्हाला सामर्थ्य प्रदान करो.

तसेच पाकिस्तानच्या अहमदींसाठीही प्रार्थना करा, अल्लाह त्यांचे दुष्ट आणि विरोधकांच्या हेतूंपासून रक्षण करो. पाकिस्तानात राहणाऱ्या अहमदींनीही स्वतःसाठी प्रार्थना करावी. तीन-चार दिवस किंवा आठवडाभर प्रार्थना नव्हे, तर सतत प्रार्थना करावी. अल्लाहच्या आदेशानुसार आपले जीवन व्यतित करण्याचे प्रण घ्या. बुर्किना फासो, बांगलादेश, अल्जेरिया आणि जगातील प्रत्येक देशातील अहमदियांसाठी प्रार्थना करा. अल्लाह प्रत्येक अहमदीला शत्रूच्या अत्याचारापासून वाचवो. सर्वशक्तिमान अल्लाह आम्हाला स्वतःमध्ये शुद्ध बदल घडवून आणण्याची आणि प्रार्थना करण्याची क्षमता प्रदान करो. आणि आमच्या प्रार्थनांना कबूल करो. आमीन.

اَلْحَمْدُلِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ
عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ
لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔